सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे [illegible] ९९ ठ. क्र. १५२
दि. १६/०९/२०१६ [illegible]
बहुमताने/सर्वा [illegible]



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने अनेक प्रकारच्या चांगल्या कामाचे आयोजन करण्यांत आले होते. त्यापैकी न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या बाजूस मोठया प्रमाणावर मोकळी जागा असून या जागेचा शौचालयाकरिता तसेच घाण टाकण्याकरिता या जागेचा वापर होतो. गेल्या कांही वर्षापासून ही जागा अशा स्वरुपात आहे. तरी ही जागा महानगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या विस्ताराकरिता उपयोगात आणावी. जेणेकरुन हे उद्यान देखील भव्य व दिव्य होण्यास मदत होणार आहे. व पडीक जागेचा देखील योग्य वापर होणार आहे. तरी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या बाजूस असणारी मोकळी जागा उद्यानाकरिता वापरात आणणेस मान्यता देणेत येत आहे. उद्यानाशिवाय इतर कोणत्याही प्रकारे जागेचा वापर करता कामा नये.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकूब/आयुक्तो/विभाग
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २०० ठ. क्र. २४३
दि. २६/८/९६ रोजी ठेवता झालेल्या प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सम्राट चौक ते जुना कारंबा नाका मॉडेल रस्ता तयार करणे. या परिसरामध्ये सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्देश्वर महाराजांच्या काठी मार्ग असून, याच परिसरात गणपती मंदिर, आयुर्वेद कॉलेज मोठया प्रमाणात व्यापारी लोकांच्या वसाहती या परिसरात असून, हा रस्ता नेहमीच वर्दळीचा असतो.

तसेच पापासेठ बलदवा घर ते ॲम्बॅसिडर हॉटेल पर्यंत मुख्य रस्त्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. हा रस्ता सध्या कच्चा असून, मोठया प्रमाणावर रहदारी वाढलेली आहे. त्यामुळे शिवाजी चौकाकडे जाणारी दुचाकी वाहने मोठया प्रमाणावर या रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे हा रस्ता डांबरीकरण झाल्यास चार चाकी वाहने देखील याचा उपयोग होणार आहे. परिणामी शिवाजी चौकातील वाहनांची गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे.

नाकोडा चौक ते गॅस पंपाच्या समोर एक्सप्रेस वे पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. हा रस्ता देखील सध्या कच्च्या स्वरुपात आहे. याठिकाणी व्यापारी वसाहती मोठया प्रमाणात आहेत. या परिसरात ड्रेनेजचे काम व पिण्याचे पाण्याचे पाईप लाईनचे काम पूर्ण करण्यांत आलेले आहे. हा रस्ता पक्का झाल्यास सम्राट चौक ते पुणा नाक्याकडे जाण्या-या वाहनांना सोयीस्कर मार्ग होणार आहे. रस्त्यावरील वाहनांची गर्दी देखील कमी होण्यास मदत होणार आहे.

वरील तिनही रस्ते शासन अनुदान किंवा मुख्य कार्यालयाकडील उपलब्ध तरतूदीमधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१०१..ठ. क्र.१५४
दि..१६।८।१६.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने संपूर्ण देशामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आलेले असून, हे पूर्ण वर्षभर जयंतीवर्ष म्हणून साजरी करण्यात येत आहे. त्यामुळे अनेक विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यांत आलेले आहेत. **त्यापैकीच एक म्हणजे भारतीय बौध्द महासभेच्या अंतर्गत बुध्द महाविहार समिती जिल्हा शाखा सोलापूर या संस्थेच्या वतीने अनेक लोकोपयोगी सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत येते.** सोलापूरातील (हद्दवाढ भाग) मौजे दहिटणे बक्षी हिप्परगा रोड येथे नविन सभा मंडप व या सभा मंडपामध्ये मेडीटेशन, पालीभाषा वर्ग, बुध्दवंदना इत्यादी कार्यक्रमाकरिता नविन सभा मंडप होणे गरजेचे आहे. या परिसरामध्ये समाज बांधव मोठया प्रमाणात असून परंतू सभा मंडप नसल्यामुळे वरील कार्यक्रम करता येत नाही. याकरिता मौजे दहिटणे बक्षी हिप्परगा रोड येथे नविन सभा मंडप बांधणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस आणि बजेट तरतूद शहरातील पुतळे परिसर सुधारणा करणे व नविन पुतळे बसविणे व स्मारक बांधणे सन २०१६-१७ करिता ठेवणेत आलेल्या तरतूदीमधून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. १०२ ठ. क्र. १५५ दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवला असलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



होटगी रोड येथील मुलतानी बेकरी समोरील मकदूम हॉल लगत पासून आंबेडकर नगरमधील पंचशील प्राथमिक व माध्यमिक शाळेपर्यंत जाणा-या रस्त्यास दलितमित्र व सामाजिक कार्यकर्ते **बुध्दवासी नागनाथ कृष्णा रणधिरे** यांचे नांव देणेस, सदर ठिकाणी नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकक्ष/मा.को./विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा. १०३ ठ. क्र. १५६ दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. धनंजय नामदेव अलाट रा. ११०/२ रेल्वे लाईन सोलापूर, यांच्या काकू श्रीमती इंदूबाई भिमाशंकर अलाट यांना किडनीचा विकार झालेला असून त्यांच्यावर त्यासंबंधी श्री. मार्कंडेय रुग्णालय, सोलापूर या ठिकाणी उपचार करण्यात आलेला आहे. त्यांच्यावर किडनीचा उपचार डायलेसीस वगैरे करणेकरिता र.रु. १.५० लाख ते र.रु. २.०० लाखापर्यंत खर्च अपेक्षित असून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. तरी त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याने महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. १०४ ठ. क्र. १५८ दि. १६/९/१६ रोजी ठेवता झालेल्या प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सिटी सर्व्हे नं. १६०८ (शोभा नगर सात रस्ता सोलापूर) समोरील महानगरपालिकेचे हद्दीत असलेल्या खुल्या जागेत तेथे असलेल्या १) तानाजी शिवाजी जाधव २) रुपाली अश्विन भांगे ३) सिध्दाराम श्रीशैल अरळीकर ४) ज्ञानेश्वर जालींदर जाधव ५) अप्पा महादेव शिंदे ६) किरण मंचाले ७) शशिकांत सोपानराव शिंदे ८) शिला मोहन मोरे ९) आरती अनंत दिवाणजी १०) अतुल कुंडलिक शिंदे ११) भास्कर दिनकर मोरे १२) योगेश पटणे १३) अरुण खटावकर १४) विनायक कुंभार १५) संभाजी शिवाजी जाधव १६) प्रभाकर शिवाजी जाधव १७) रविकांत मठपती १८) मल्लीनाथ श्रीशैल अरळीकर या बेरोजगार लघु उद्योजकांसाठी त्यांच्याकडून डिपॉझीट कॉन्ट्रीब्युशन घेऊन महानगरपालिकेच्या वतीने व्यवसाय करणेकरिता मिनी शॉपिंग सेंटर बांधून देणेस याकामी येणा-या खर्चास व सदरचे मिनी गाळे वरील नमूद उद्योजकांना २९ वर्षे मुदतीने भाडयाने देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच १९) रवि सवरप्पा म्हेत्रे यांचे नांव समाविष्ठ करुन प्रस्तावात नमूदप्रमाणे कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

परंतू वर नमूद अ.क्र. १ ते १९ नावामध्ये नगरसेवक यांचे नातेवाईक अथवा त्यांचे नांवे इतरत्र गाळे असल्यास ती नावे वगळून पुढील योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ....७१....ठ. क्र....९५८
दि...२६।०१६.........राजो ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ४२ मध्ये गुरुनानक चौक ते कृष्णा सोसायटी पर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन घालणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. २०१६-१७ र.रु. ९,९६,८०१/- इतकेचे तयार केले असून याकामी येणारा खर्च सन २०१६-१७ चे भांडवली कामे करणे/मा. शासन अनुदान या बजेट सदरातून र.रु. १०.०० लाख इतकी तरतूद उपलब्ध होवून मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १२-५-१६ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी सन २०१६-१७ चे भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/उजनी पाकणी सोरेगांव भवानी पेठ येथे प्लो मिटर बसविणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका